# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण। कंपनी मर्यादित

MAHADISCOM

वाणिज्य विभाग, प्रकाशगड- ५वा मजला,
अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई.४०००५१.
फोन: (वै)२६४७४७५३ (का)२६४७४२११; फॅक्स २६४७२३६६


**पी-आर-३/जनरल/९३२२** **दिनांक १८.०४.२००६**

## परिपत्रक क्र.३५

**विषय :** वीज ग्राहकांना रांगेत उभे राहण्याचे टाळण्याकरिता चेकने भरणा करण्यासाठी प्रोत्साहीत करण्याबाबत.

-------------------

वरील विषयासंदर्भात तक्रारी प्राप्त होत आहेत कि, वितरण कंपनीच्या वीज देयक भरणा केन्द्रामधे पावती देण्याच्या पध्दतीमुळे वीज ग्राहकाला वीज देयक भरणा करायला अनेक तास रांगेत उभे राहावे लागते. परिणामी वीज देयकाचा भरणा करणा-या ग्राहकांचा अमूल्य वेळ वाया जात असतो. व त्याचा विपरीत परिणाम ग्राहकांचा वीज बील न भरण्याच्या उदासीनतेमधे होतो व थकबाकीच्या रकमेत वाढ होते.

विज ग्राहकांना तासनतास देयक भरणा केन्द्रात ताटकळत उभे राहण्याचे टाळण्याकरिता व ग्राहकांच्या सोयीकरिता ग्राहकाने चेकने वीजेंच्या देयकाचा भरणा केल्यास वीज ग्राहकांना होत असलेली रांगेची कटकट टाळता येऊ शकते.

ग्राहकांचा रांगेचा त्रास कमी करण्याबाबत सर्व क्षेत्रीय अधिका-यांना सुचविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या क्षेत्रातील ग्राहकांना चेकने देयकाचा भरणा करण्याबद्दल प्रोत्साहीत करावे.

तसेच चेकने भरणा केल्यास थकबाकीच्या कारणासाठी वीज पुरवठा खंडीत करायला पावतीची मागणी करण्यात येते व या कारणाकरिता ग्राहक चेकने देयकाचा भरणा करण्यास उदासीन असतो. अश्या वेळी ग्राहकांने चेकचा क्रमांक सादर केला तरी त्याचा विजपुरवठा थकबाकीच्या कारणास्तव खंडीत करण्यात येऊ नये, व ही बाब ग्राहकांना पटवून देण्यात यावी व ही बाब वीज बिल भरणा केन्द्रावर स्पष्टपणे सुचना फलकाव्दारे दर्शविण्यात यावी. जेणे करुन ग्राहकांच्या मानसिकतेत बदल होऊन चेकने भरणा करण्यास जास्तीत जास्त प्रमाणात ग्राहक तयार होतील. परिणामी तासनतास रांगेत उभे राहावे लागायची तक्रार कमी होऊन वेळेत वीज देयक भरणा करण्यास ग्राहकांचा कल वाढेल. तसेच वितरण कंपनीच्या सर्व कार्यालयामध्ये ग्राहकांच्या सोयीकरिता वीज देयक भरणा केंद्र व ड्रॉप बॉक्सेस बाबतची माहिती ठळक फलकाव्दारे दर्शविण्यात यावी .

सदर बाबतीत सर्व क्षेत्रीय अधिका-यांना कळविण्यात येते कि, या बाबतीत आवश्यक त्या योग्य उपाय योजना करुन योग्य त्या माध्यमाव्दारे ग्राहकांचे प्रबोधन करावे.

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

प्रति,

१.मुख्य अभियंता ,सर्व संवसु परिमंडळे.
२.अधिक्षक अभियंता, सर्व संवसु कार्यालये
३.कार्यकारी अभियंता, सर्व संवसु विभागीय कार्यालये
४.उप कार्यकारी अभियंते/सहाय्यक अभियंते , सर्व संवसु उप विभागीय कार्यालये

C:\joshis\EEI\MARATHI\AE\ELEBILLCHEQUERECEIVED.doc

Created by Neevia Personal Converter trial version http://www.neevia.com